# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

## स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना) कक्ष

जा.क्र.नांवाशमनपा/स्वमअ/ ३५०० /२४ दि. ०४/०७/२०२४

## जाहीरात

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना) अंतर्गत घेण्यात येणारे विविध कामे, उपक्रम व स्वच्छ सर्वेक्षण संबधित सर्व घटकांची कामे करण्याकरीता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड करीता निव्वळ कंत्राटी तत्वावर "शहर समन्वयक" (City Co-ordinator) – पदसंख्या – १ (एक) (निव्वळ कंत्राटी तत्वावर) एकत्रित मानधन प्रतिमहिणा रु.४५०००/- प्रमाणे उक्त पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहे. पदभरती बाबत संक्षिप्त माहिती खालील प्रमाणे

| | |
|---|---|
| **शैक्षणिक अर्हता** | मान्यता प्राप्त विद्यापिठाची - बी.ई/ बी.टेक (कोणतीही शाखा), २) बी.आर्क. ३) बी.प्लानींग ४) बी.एस.सी. (कोणतीही शाखा) या पैकी कोणतीही पदवी पूर्ण |
| **वयोमर्यादा** | वय ३५ वर्ष ("शहर समन्वयक" म्हणुन अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारास अनुभवा इतकी वयोमर्यादा शिथील |
| **अनुभव** | स्थानिक स्वराज्य संस्था (नागरी) कार्यालयाशी निगडीत कामाचा किमान सहा महिण्याचा अनुभव आवश्यक. |
| **अर्ज स्विकृती दिनांक** | जाहीरात प्रसिद्ध झाल्यापासुन ते दिनांक २२.०७.२०२४ सायं ५.०० वा. पर्यंत<br>(उक्त कालावधीत फक्त कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेत अर्ज स्वीकारण्यात येईल) |
| **अर्ज स्विकृती स्थळ** | स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना) , कक्ष.क्र.३०९, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, मुख्य प्रशासकिय इमारत, छ.शिवाजी महाराज पुतळा जवळ, नांदेड. |

विहीत वेळेनंतर कोणत्याही परिस्थीतीत अर्ज स्विकारल्या जाणार नाहीत. सदरील पदभरती बाबत सविस्तर माहिती, नियम व अटी, अर्जाचा नमुना व अर्ज स्विकृतीनंतर आवश्यकतेनुसार वेळोवेळी भरतीप्रकिये बाबतची सूचना महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीच्या नोटीस बोर्ड व www.nwcmc.gov.in या संकेतस्थळावर पहावयास मिळतील. अर्जदारांना त्याबाबत वेळोवेळी अवलोकन करावे करीता, शैक्षणिक अर्हताधारण व अटी पुर्ण करणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी पदभरतीची सविस्तर माहिती, नियम व अटींचे वाचन करुन विहीत वेळेत परिपूर्ण अर्ज सादर करावा. टिप:- प्राप्त होणारे एक किंवा सर्व अर्ज स्वीकारणे अथवा नाकारणे याचे सर्व अधिकार आयुक्त, नांवाशमनपा नांदेड यांनी राखुन ठेवले आहेत.

(मा.आयुक्त यांचे मान्यतेने)

स्वाक्षरीत/-

**उपआयुक्त (स्वमअ)**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

| | |
|---|---|
| **नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड** | |
| वेब साईट: www.nwcmc.gov.in | ई-मेल : info@nwcmc.gov.in |
| दुरध्वनी क्र. ०२४६२-२३४७१०,२३४५७७,२३४४०४ | फॅक्स क्र.०२४६२-२३२०७१ |
| शाखा:- स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना) कक्ष | जाक्र:-स्वमअ/ ३४९९ /२४-२५ |
| | दिनांक :- ०४.०७.२०२४ |

## स्वच्छ महाराष्ट्र अंतर्गत कंत्राटी तत्वावर "शहर समन्वयक" (City Co-ordinator) पद भरती सुचना

**विषय**:- कंत्राटी तत्वावरील शहर समन्वयक पद भरतीची कार्यवाही करणे बाबत,

**संदर्भ**:- मा.राज्य अभियान संचालक स्वमअ (ना) यांचे पत्र क्र.जा.क्र.राअस शहर समन्वयक /२१४/२३-२४ दिनांक २३.०२.२०२४

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत घेण्यात येणाऱ्या विविध कामे करण्यासाठी संदर्भीय पत्रकाच्या अनुषंगाने, कंत्राटी तत्वावरील "शहर समन्वयक" (City Co-coordinator) पद भरतीची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर करण्यास कळविले आहे. त्याअनुषंगाने विहीत नियम व अटी अधिन राहुन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड- स्वच्छ महाराष्ट्र अभियान कक्षाकरीता निव्वळ कंत्राटी तत्वावरील शहर समन्वयक (City Co-coordinator) चे ०१ पदाची भरती प्रक्रिया सुरु करण्यास तथा पद भरती करण्यास याव्दारे मान्यता देण्यात येते.

त्या अनुषंगाने, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड - स्वच्छ महाराष्ट्र अभियान कक्षाकरीता निव्वळ कंत्राटी तत्वावर "शहर समन्वयक" (City Co-ordinator) या पदानामाकरीता ०१ (एक) पद भरतीची/ नियुक्तीची प्रकिया करीत आहे. सदरील पदभरती बाबत खालील प्रमाणे सविस्तर माहिती देण्यात येत आहे.

करीता, निव्वळ कंत्राटी तत्वावर "शहर समन्वयक" (City Co-ordinator) पद ०१ (एक) करीता खालील दिलेल्या शैक्षणिक अर्हता, पात्रता व अनुभवाचे निकड पुर्ण करणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी सदरील भरती प्रकिये बाबत खालील माहिती नियम व अटी वाचून समजून विहीत वेळेत रितसर अर्ज सादर करावे.

### कंत्राटी तत्वावर "शहर समन्वयक" (City Co-ordinator) पद भरती

**पदनाम** :- "शहर समन्वयक" (City Co-ordinator) (कंत्राटी तत्वावर)

**पदसंख्या** :- 01 (एक) पद

**शैक्षणिक अर्हता:** – मान्यता प्राप्त विद्यापिठाची - बी.ई/ बी.टेक (कोणतीही शाखा), २) बी.आर्क. ३) बी.प्लानींग ४) बी.एस.सी. (कोणतीही शाखा) या पैकी कोणतीही पदवी पूर्ण केलेली असावी.

**वयोमर्यादा** :– वय ३५ वर्ष ("शहर समन्वयक" म्हणुन अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारास अनुभवा इतकी वयोमर्यादा शिथीत करता येईल

**अनुभव**:- स्थानिक स्वराज्य संस्था (नागरी) कार्यालयाशी निगडीत कामाचा किमान सहा महिण्याचा अनुभव आवश्यक. तसेच स्वच्छ भारत अभियान - स्वच्छ भारत अभियान अंतर्गत विविध अभियान व स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत "शहर समन्वयक" (City Co-ordinator) पदाचा अनुभव धारकास प्राधान्य व गुणांकनात गुण राखिव. तसेच उमेदवारास संगणक चालविण्याचा अनुभव तथा MS-CIT प्रमाणपत्र धारक असावा.

**मानधन**:- एकत्रित मानधन प्रतिमहिणा रु. ४५०००/- (अक्षरी- पंचेचाहीस हजार रुपये प्रतिमहिणा फक्त)

**गुणांकन**:- एकुण १५ गुण- (अ) अनुभवास - एकुण ७ गुण (ब) मुखाखतीस - एकुण ३ गुण
(क) स्वच्छ भारत अभियानविषयाचे ज्ञान - एकुण ५ गुण

**अर्ज सादर करणे** :- दिनांक : २२.०७.२०२४ दुपारी ५.०० वा. पर्यंत (प्राप्त होणारे अर्ज विहीत मुदतीमध्येचे कार्यालयीन वेळेत स्वीकारले जातील याची दक्षता घ्यावी.)

**अर्ज सादर करणेचे स्थळ**:- स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना) कक्ष, कक्ष.क्र.३०९, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, मुख्य प्रशासकिय इमारत, छ.शिवाजी महाराज पुतळा जवळ, नांदेड.

पुढील पानावर ...

**शहर समन्वयक" (City Co-ordinator) पदासाठी कार्यालयीन व नियुक्त पदाच्या कामाबाबत खालील प्रमाणे नियम व अटी**

१) सदरील पदभरती ही निव्वळ कंत्राटी पद्धतीवर असेल. सदरील पद कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाचे असल्यामुळे भविष्यात कायम सेवेचा लाभ देता येणार नाही.

२) स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत निव्वळ कंत्राटी तत्वावर "शहर समन्वयक" या पदासाठी नियुक्ती आपणास नियुक्ती दिलेल्या दिनांकापासून पुढील ११ महिण्यापर्यंत असेल. त्यानंतर नियमानुसार आपली नियुक्ती संपुष्टात येईल. तसेच, सदरील पदासाठी पुढील मुदतवाढ द्यावी किंवा नाही या बाबतचे अधिकार मा.आयुक्त महानगरपालिका, नांदेड यांनी राखून ठेवले आहेत.

३) अर्जदाराने विहीत नमुण्याचा अर्ज स्पष्ट अक्षरात४४ि भरणा करावा. (टंकलिखीत केल्यास चालेल) अर्जासह जोडण्यात येणाऱ्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती ह्या स्पष्ट तथा स्वयंसाक्षांकित केलेल्या असाव्यात.

४) वरील पद भरती बाबत ची माहिती व अर्जाचा नमुना, जाहिरात, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या नोटीस बोर्ड व www.nwcmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

५) अर्जदार हा संबंधित पदासाठीच्या शैक्षणिक अर्हतेसह शारीरिक व मानसिकदृष्टया सक्षम असावा.

६) भविष्यात इतर कोणतीही अपवादात्मक परिस्थिती उद्भवल्यास सदर पदावरील कर्मचाऱ्यांची सेवा कोणतीही पुर्वसुचना वा कोणतेही कारण न देता तात्काळ संपुष्टात आणली जाईल. नियम व अटी नमुद असलेले, तथा एका पेक्षा जास्त अर्ज स्वीकारले जाणार नाही. उमेदवारास महाराष्ट्र नागरीसेवा नियम २००५ अंतर्गत लहान कुटुंबांचे प्रतिज्ञापत्र विहीत माहिती भरणा करुन स्वाक्षरी करुन सदरचे प्रमाणपत्र अर्जासह द्यावा लागेल.

७) उमेदवाराने अर्जासोबत, जन्म तारीख पडताळणी करिता (वयाचा दाखला/ दहावीची सनद/टि.सी/ जन्म प्रमाणपत्र), फोटो आय.डी.- आधार क्रमांक कार्ड, पॅन कार्ड ड्रायव्हींग लायसन्स, रहिवाशी प्रमाणपत्र, पदासाठी शैक्षणिक अर्हतेमध्ये नमुद प्रमाणे शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे (शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका), अनुभव प्रमाणपत्र स्वयंसाक्षांकित करुन सादर करावे. तसेच मुलाखतीस पात्र असलेल्या उमेदवारांनी वरील नमुद प्रमाणे मुळ कागदपत्रांसह स्वखर्चाने मुलाखतीस उपस्थित रहावे. तसेच मुलाखतीच्या अनुषंगाने मुळ कागदपत्र व इतर आवश्यक कागदपत्रांचा स्वयंसाक्षांकित प्रतीचा एक संच सोबत आणावा.

८) वेळोवळी उमेदवारांची पात्रता यादी, मुलखतीची माहिती, अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी महानगरपालिकेच्या नोटीस बोर्ड व वेबसाईट www.nwcmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचा खाजगी/राजकीय दबाव आणल्यास त्यांना मुलाखतीस व नियुक्तीस रद्द करण्यात येईल.

९) उक्त पदभरती करणे करीता अर्जदाराने कोणत्याही स्तरावर अपूर्ण शैक्षणिक अर्हता असलेल्या अर्जदारांचे अर्ज अपात्र करण्यात येईल.

१०) उक्त पदभरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर, अपात्र / अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार तथा संदेश केला/ दिला जाणार नाही.

११) निवड झालेल्या उमेदवारांने आपली सेवा कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर निव्वळ तात्पुरत्या नियुक्ती असल्या बाबतचा रु.५००/- च्या मुद्रांक पेपर करारनामा देणे बंधनकारक आहे.

१२) सदरची भरती रद्द करणे अथवा स्थगित करणे तसेच निवड/नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर, कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार मा. आयुक्त महानगरपालिका, नांदेड यांनी राखून ठेवले आहेत.

१३) निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर उमेदवारांने चुकीची माहिती/प्रमाणपत्र/कागदपत्रे सादर केल्याचे/ दिशाभूल केल्याचे अथवा कोणत्याही प्रकारची माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी/निवड/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात/संपूष्टात आणण्यात येईल.

१४) स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) हा कालमर्यादीत कार्यक्रम असल्याने आवश्यक कामे विहीत कालावधीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने उमेदवारास नियमीत कार्यालयात उपस्थीत राहणे, कार्यालयीन वेळापत्रकाचे/नियमाचे पालन करावे लागेल. त्याअनुषंगाने उमेदवारास मुख्यालयाच्या ठिकाणी निवासी राहणे बंधनकारक आहे.

पुढील पानावर.....

१५) नियुक्त उमेदवारास स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) कक्षा अंतर्गत संबधित सर्व वरिष्ठ अधिकारी व अभियत्यांच्या अधिनिस्त /संपूर्ण नियंत्रणाखाली काम करण्याचे आहे. उमेदवारास सोपविण्यात आलेल्या कामाचा दरमहा आढावा संबंधित उपआयुक्त तथा नोडल अधिकारी घेतील.

१६) स्थानिक नागरी स्वराज्य संस्थामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत उत्कृष्ट अंमलबजावणी चे कामकाज उमेदवारास वरिष्ठांनी दिलेल्या सुचनेनुसार व केंद्र / राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार करणे बंधनकारक राहील.

१७) अभियानांतर्गत केलेल्या कामाचे दस्ताऐवजीकरण अद्यावत करणे तसेच कार्यालयीन कामकाजाकरिता आवश्यक त्या बैठकींना उपस्थित रहाणे बंधनकारक राहील. त्या अनुषंगाने होणारा प्रवास खर्च, दैनिक भत्ता व इतर भत्ते अनुज्ञेय राहणार नाही.

१८) प्रवास करताना कोणत्याही प्रकारचा अपघात झाल्यास, अपघातासंबंधी कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई, मोबदला, कायम तथा कंत्राटी नियुक्ती, तथा इतर या कार्यालयामार्फत अनुज्ञेय राहणार नाही.

१९) नियुक्त उमेदवार कामावर गैरहजर राहिल्यास मानधनाच्या रक्कमेतून त्या अनुषंगाने रक्कम कपात करण्यात येईल, त्या संदर्भात योग्य ती कारवाई ही केली जाईल.

२०) नियुक्त उमेदवाराने कामकाज करतांना संकलीत केलेली माहिती, प्राप्त होणारी कार्यालयीन कागदपत्रे, माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनियता बाळगणे आवश्यक राहील. तसेच कार्यमुक्त होतांना सदरची कागदपत्रे, माहिती व आधार सामुग्री (Softcopy किंवा hardcopy सह) स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) कक्ष नांदेड वाघाळा शहर महानरपालिका नांदेड यांचेकडे जमा करणे आवश्यक राहील. तसेच, संकलीत केलेली, तयार केलेली माहिती कागदपत्रे (Softcopy किंवा hardcopy सह) यावर उमेदवाराचा कोणत्याही स्तरावर कोणताही अधिकार कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, मोबदला मागता राहणार नाही.

२१) उमेदवाराचे नियुक्तीचे पद पूर्णतः कंत्राटी तत्वावर एकत्रित वेतनावर असल्याने, नियमित शासकीय सेवेत समायोजनासंबंधी कोणताही दावा उमेदवारास दाखल करता येणार नाही.

२२) पदभार स्वीकारल्यानंतर उमेदवारास नियुक्तीच्या कालावधीत किमान स्वच्छ सर्वेक्षण सर्व घटकांची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत आपणास कोणत्याही परिस्थितीत राजीनामा देता येणार नाही.

२३) उमेदवारावर कोणत्याही प्रकारचा फ़ौजदारी गुन्हा दाखल असल्यास / झाल्यास किंवा असे निदर्शनास आल्यास आपली नियुक्ती तात्काळ रदद् करण्यात येईल.

२४) नियुक्त, शहर समन्वयक" (City Co-ordinator) उमेदवारांना यांना "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) '' अंतर्गत कामा व्यवतिरीक्त इतर कार्यालयीन कामात हस्तक्षेप करता येणार नाही.

२५) उमेदवाराच्या नियुक्तीच्या कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारचे 'Conflict Of Interest निदर्शनास आल्यास आपली नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

२६) उमेदवाराने नियुक्तीच्या कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन केल्यास आपली नियुक्ती कारण न देता तात्काळ रदद् करण्यात येईल.

२७) "शहर समन्वयक" पदी नियुक्त केलेल्या उमेदवाराचे काम असमाधानकारक तथा कामास असक्षम वाटल्यास तथा कोणतेही कारण न देता अभियानाच्या कोणत्याही स्तरावर महानगरपालिका मा. आयुक्त यांना नियुक्त केलेल्या शहर समन्वयकास / उमेवारास नियुक्ती पदावरुन काढुन टाकण्याचा / नियुक्त रद्द करण्याबाबत चे मा. आयुक्त महानगरपालिका नांदेड यांना सर्व अधिकारी असतील.

२८) तसेच, आवश्यकतेनुसार उक्त नियम व अटी मध्ये अशत: / पूर्णत: बदल करणे तथा रद्द करणेचे सर्व मा. आयुक्त महानगरपालिका नांदेड यांना सर्व अधिकारी असतील.

**शहर समन्वयक" (City Co-ordinator) पदाचे सर्वसाधारण कामाचे स्वरुप -**

1) नियुक्त, शहर समन्वयक" (City Co-ordinator) उमेदवारांना यांना मुख्यालयी राहुन, कार्यालयीन वेळापत्रकाचे पालन करीत कामे करावे लागेल.

2) स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षणात तथा इतर घटकात बऱ्याच नवीन तांत्रिक पद्धतीचे घटकांचा समावेश केलेला आहे. जसे – दरमहा MIS भरणा करणे, वेळोवेळी संबधित वेबसाईटवर माहिती तथा आकडेवारी भरणा करणे, GIS मॅपींग करणे, शासनास On-line पद्धतीने माहिती/ आकडेवारी सादर करणे, स्वच्छ सर्वेक्षणाच्या अनुषंगाने कार्यालयातुन, क्षेत्रभेटी देवुन माहिती व आकडेवारी संकलीत करणे, स्वच्छ

पुढील पानावर.....

सर्वेक्षण अंतर्गत सर्व घटकातील सर्व माहिती, आकडेवारी, प्रभावी Documentation तयार करणे, तयार केलेले Documentation वरिष्ठांच्या परवानगीने विहीत कालावधीत विहीत वेबसाईटवर अपलोड करणे, शहरात विविध ठिकाणी स्वच्छ सर्वेक्षणाच्या अनुषंगाने तयारी करणे, वेळोवेळी आयोजित केलेल्या अभियानात सहभागी होवुन, अभियान प्रभाविपणे यशस्वीरित्या पार पाडण्याच्या दृटीने कार्यवाही करणे. सदरील सर्व कामे हे वेळापत्रकानुसार तथा विहीत वेळेत नियुक्त शहर समन्वयक" (City Co-ordinator) यांना पुर्ण करणे बंधणकारक आहे.

3) उपरोक्त कामे ही टंकलेखनीय स्वरुपाची आहेत. सदरील माहिती Documentation प्रभावीरित्या तयार करण्यासाठी नियुक्त शहर समन्वयक" (City Co-ordinator) यांनीच तयार आवश्यक आहे. त्यासाठी कार्यालया मार्फत कोणतेही अतिरीक्त मानधन, भत्ते, तथा टायपिस्ट/कर्मचारी पुरवठा केला जाणार नाही.

मानधन –

1) नियुक्त "शहर समन्वयक" (City Co-coordinator) यांचे पद नियम व अटी अधिन राहुन नियुक्ती दिनांका पासुन पुढील ११ महिण्यासाठी राहील.
2) "शहर समन्वयक" या पदासाठी नियुक्त उमेदवारास दरमहा रु.45,000/- (अक्षरी- पंचेचाळीस हजार रुपये फक्त) एकत्रित मानधन दिले जाईल. सदरील मानधन हे कॅलेंडर महिण्यानुसार प्रत्येक महिणा संपल्यानंतर अदाई करण्यात येईल.
3) "शहर समन्वयक" या पदासाठी नियुक्त उमेदवारास कोणतेही शासकीय लाभ प्रत्यक्षपणे अथवा अप्रत्यक्षपणे मिळणार नाहीत अथवा त्यांना कसल्याही प्रकारचे वेतन भत्ते अदा केले जाणार नाहीत. तसेच नियमानुसार शासकीय कपात लागु असेल.
4) सदरील मानधन हे संबधित आर्थिक वर्षामधील (सानसन २०२४-२५) महानगरपालिकेच्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना) या शिर्षकातुन खर्च करण्यास व संबधितास नियम व अटी अधिन राहुन विहीत पद्धतीने अदाई करण्यात येईल.

तरी, कंत्राटी तत्वावरील शहर समन्वयक पद भरतीची कार्यवाही करणे अनुषंगाने उपरोक्त प्रमाणे सर्व नियम, अटी व शहर समन्वयक" (City Co-ordinator) पदाचे सर्वसामान्य कामाचे स्वरुपास याव्दारे मान्यता देण्यात येते. तसेच, सदरील नियम व अटी अधिन राहुन कंत्राटी तत्वावरील शहर समन्वयक पद भरतीची कार्यवाही करावी. सदरील पद भरती संदर्भातील जाहिरात स्थानिक मराठी व उर्दु वृत्तपत्रासह नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर विहीत कालावधीत प्रसिद्ध करावी.

( मा.आयुक्त यांचे मान्यतेने )

स्वाक्षरीत/-

**अतिरीक्त आयुक्त**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

( उमेदवाराने कंत्राटी  शहर समन्वयक" (**City Co-ordinator**) या पदासाठी करावयाचा अर्जाचा नमुना )

अर्जदाराचा नजिकच्या
काळातील पासपार्ट
आकाराचा फोटो
येथे चिटकावावा

**मा. आयुक्त,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**विषय :-** कंत्राटी तत्वावरील शहर समन्वयक" (City Co-ordinator) या पदासाठी अर्ज सादर करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त जाहिरातीच्या अनुषंगाने मी,..........................................................(अर्जदाराचे नाव) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड - स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) कक्ष अंतर्गत कंत्राटी तत्वावरील शहर समन्वयक" (City Co-ordinator) या पदासाठी अर्ज करीत आहे. व त्यांची आवश्यक माहिती खालील प्रमाणे आहे.

1) उमेदवाराचे नाव : (मराठी मध्ये- अडनाव प्रथम) ..............................................................

2) उमेदवाराचे नांव (SURNAME FIRST- IN ENGLISH CAPITAL LETTER)
..........................................................................................................................

3) पत्र व्यवहाराचा सदयाचा संपुर्ण पत्ता रा. ...........................................................................
ता. ................ जिल्हा. ......................... पिन कोड क्र. ..........................
मोबाईल क्र. ........................... ई-मेल ....................................................................

4) कायमचा संपुर्ण पत्ता रा. ......................................................................................
ता........................... जिल्हा. ......................... पिन कोड क्र. ..........................
मोबाईल क्र. ........................... ई-मेल ...................................................

5) जन्म तारीख (अंकात) दिनांक ........... महिना ............... वर्ष ...........

6) जाहिरातीच्या दिनांकास वय वर्ष .............. महिना ............ दिवस ..........

7) राष्ट्रीयत्व ..........................................................

8) महाराष्ट्र राज्याचा रहिवासी प्रमाणपत्र जोडले आहे काय ? होय / नाही.

9) अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशील.

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | बोर्ड/मंडळ/ विद्यापीठ | प्राप्त गुण | टक्केवारी | उत्तीर्ण वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १. | पदवी | | | | |
| २. | पदवीका | | | | |
| ३. | **इतर** | | | | |
| ४. | | | | | |
| ५. | | | | | |
| ६. | | | | | |

१४. शहर समन्वयक पदाचा अनुभव:- होय / नाही

(असल्यास किती वर्षाचा व कोणत्या कार्यालयाचा आहे. ते खालील प्रमाणे नमूद करावे.)

१) अनुभवाचा कालावधी ..................... वर्ष/ महिणे

कार्यालयाचे नाव ........................................................................

२) अनुभवाचा कालावधी ..................... वर्ष/ महिणे

कार्यालयाचे नाव ........................................................................

३) अनुभवाचा कालावधी ..................... वर्ष/ महिणे

कार्यालयाचे नाव ........................................................................

४) अनुभवाचा कालावधी ..................... वर्ष/ महिणे

कार्यालयाचे नाव ........................................................................

मी असे प्रमाणित करतो / करते की, मी, उक्त पदभरती संबंधित नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या नोटीस बोर्डवरील जाहीरात व सुचना /स्थानिक वृत्तपत्रामधिन प्रसिद्ध केलेली जाहीरात/ www.nwcmc.gov.in या संकेतस्थळावरील प्रसिद्ध केलेली शहर समन्वयक पदभरती जाहीरात, सर्व माहिती, नियम व अटींचे वाचन केले असुन त्या सर्व माहिती, नियम व अटी मला मान्य आहेत. तसेच अर्जात नमूद केलेली माहिती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुध्द कायदेशिर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

(सोबत:- नियम व अटीत नमुद नूसार पात्रता व शैक्षणिक संबधित कागदपत्रांची स्वयंसाक्षाकित केलेली छायांकित प्रत व लहान कुटुंबांचे प्रतिज्ञापत्र )

दिनांक :- / /२०२४

उमेदवारांची स्वाक्षरी

ठिकाण :-

संपूर्ण नांव-----------------------------------

राहणार.--------------------------------------

ता. ..........................जिल्हा...............

मो.क्र.................................................

महाराष्ट्र नागरीसेवा (लहान कुटुंबांचे प्रतिज्ञापत्र)
नियम २००५ मधील प्रतिज्ञाप्रत्राचा
**नमुना - अ**

मी,श्री/श्रीमती.............................................................................. श्री........................ ..............................यांचा/यांची/मुलगा/मुलगी/पत्नी वय.........वर्ष राहणार ................................ याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करतो/करते की,

1) मी **शहर समन्वयक** या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

2) आज रोजी मला (संख्या)................(अक्षरी) ........................ इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या,........ ..........................आहे. (असल्यास जन्म दिनांक नमूद करावा.)
(मुलांची जन्म दिनांक - ------------------------------------------------------------------ -------------------)

3) ह्यात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ व तंद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

दिनांक :- / /२०२४

उमेदवारांची स्वाक्षरी

ठिकाण :-

संपूर्ण नांव-----------------------------------
राहणार.--------------------------------------
ता. ..........................जिल्हा..............
मो.क्र................................................